महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/०८/२०२४/0351 दिनांकः १४.०६.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०१.०४.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २९.०४.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०७.०५.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | १४.०६.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०८/२०२४**

श्री. विकास शिवाजी सोनवणे **... अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई **... प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक ०१.०४.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०१.०४.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक ०१.०४.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०४.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक ०७.०५.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०७.०५.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक १०.०५.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक ३०.०५.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ३०.०५.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी व जन माहिती अधिकारी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. श्री. नितीन प्रधान वकील यांनी आयोगाच्या कार्यालयात दिनांक ०८/०२/२०२४ रोजी आवक क्रमांक ०४२३ नुसार नोंदविण्यात आलेल्या बिलाची साक्षांकित प्रत.
२. श्री. नितीन प्रधान वकील यांनी आयोगाच्या कार्यालयाने कोणत्या कामासाठी आणि कोणाच्या आदेशाने नियुक्त केले होते. त्याअनुषंगाने आयोगाच्या कार्यालयात उपस्थित केलेल्या नस्तीच्या आणि पत्राच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.
३. श्री. नितीन प्रधान वकील यांनी आयोगाच्या कार्यालयात दिनांक ०६/०२/२०२४ रोजी दाखल केलेल्या बिलाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयातील लेखा शाखेकडून श्री. नितीन प्रधान वकील यांना कोणत्या तारखेला धनादेश देण्यात आला होता. सदर धानदेशाची साक्षांकित प्रत.
४. कोणत्याही गुन्ह्याचा आरोप असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचा बचाव करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला सार्वजनिक पैसा खर्च करण्याबाबत कोणत्या कायद्या अंतर्गत अधिकार आहेत. याबाबतची संपूर्ण कागदपत्रांसाहित माहिती साक्षांकित प्रति मध्ये प्राप्त करून देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

१. मुद्दा क्र. १ ते ३ साठी दिलेले उत्तरः सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही.
२. मुद्दा क्र. ४ साठी दिलेले उत्तरः Information asked in question format. The act does not permit raising imaginary questions and expecting the PIO to find answers for them.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली नाही. तसेच कलम ८ (१) चा आधार घेऊन माहिती नाकारताना माहिती नाकारण्याची संपूर्ण कारणे देखील दिली पाहिजेत. तसेच माहिती अधिकार कायदयान्वये माहिती नाकारताना इतर कायद्याचा आधार घेता येत नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये विचारण्यात आलेली माहिती श्री. नितीन प्रधान वकील यांना आयोगाच्या कार्यालयाने नियुक्त केलेल्याची कारणे तसेच त्यांना दिलेल्या धनादेशाची प्रत मिळणे बाबत असल्याचे दिसून येते. सदर अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी केंद्रीय माहिती आयोग यांच्या आदेश क्र. CIC/OK/A/२००६/००१३६ दिनांक २७ सेप्टेंबर २००६ च्या आदेशाचा संदर्भ देऊन वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार कायदा कलम ८ (१) चा आधार घेऊन माहिती नाकारताना कारणे देणे अपेक्षित आहे असे मौखिक निवेदन सुनावणी दरम्यान सादर केले. तसेच महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांच्या ०८ एप्रिल २०१३ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे ज्यामध्ये आयोगाच्या कोणत्याही आदेशाचा भंग होणार नाही असे सुचवले आहे.

त्याच प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडताना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१२/९८९/ प्र. क्र. ४७९/ सहा, दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ चा संदर्भ घेऊन असे मौखिक निवेदन सादर केले आहे त्यात वरील शासन परिपत्रकामद्धे निर्देशित केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोट कलम (त्र) मधील तरतुदी नुसार जि माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषतः जी त्रयस्थ पक्षा सोबत उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागवलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या कॅनरा बँक विरुद्ध सी. एस. श्याम आणि आणखी यांच्या दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ रोजी दिलेल्या निर्णया नुसार वयक्तिक स्वरूपाची माहिती सादर न करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्रीय सतर्कता आयोग यांच्या दिनांक ०३.०३.२०१७ च्या परिपत्रक प्रमाणे एकाच माहितीसाठी पुनः अर्ज सादर करणे हे माहिती नाकारण्याचा आधार होऊ शकतो या निर्णयांचा आधार घेत आपले मौखिक निवेदन सादर केले.

त्याअनुषंगाने सदर अपीलातील वस्तुस्थिती आणि दोन्ही पक्षांनी केलेले निवेदन लक्षात घेऊन असे निर्देशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा कलम ८ (१) चा आधार घेऊन माहिती नाकारताना कोणत्या बाबींचा आधार घेतला आहे ते संक्षिप्त मध्ये नमूद करावे. तसेच, अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी निगडीत आहे. सदर माहिती पुरविण्यासाठी माहिती अधिकार कायदा मध्ये कलम ११ मध्ये तरतूद केलेली आहे. शिवाय, त्रयस्थ पक्षाची माहिती ही लोकहिताच्या दृष्टीने व्यापक

जनहित साध्य करणारी आवश्यक आहे. परंतु, सदर प्रकरणात असे दिसून येत नाही त्यामुळे सदरची माहिती देता येऊ शकत नाही.

शिवाय, मुद्दा क्रमांक दोन तीन व चार संबंधित माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे माहिती अधिकार कायदा अंतर्गत प्रश्नांची माहिती म्हणून व्याख्या केलेली नाही. त्यामुळे ती माहिती देता येऊ शकत नाही.

वरील कारण मिमांसेवरून सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

प्रथम आपीलिय अधिकारी हे फोरम ऑफ रेग्युलेटर यांच्या राष्ट्रीय स्थरावर होऊ केलेल्या परिषदेसंबंधी काममध्ये अनेक ठिकाणी दौरा करावे लागल्या कारणाने सदरहू अपील ४५ दिवसात निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. विकास शिवाजी सोनवणे,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
११ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, मुंबई

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई